I J R S S I S, Issue (IX), Vol. (I), May 2023: 204-210
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# केंद्र शासनाच्या महत्वपूर्ण योजनांच्या प्रगतीचा आढावा (विशेष संदर्भ : चंद्रपूर जिल्हा)

**शरयु मनीष पोतनूरवार**
अर्थशास्त्र विभाग, सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर
*Corresponding Author :- sharyurbidwai@gmail.com

Communicated : 26.01.2023 | Revision : 02.03.2023 | Accepted : 30.03.2023 | Published : 30.05.2023

**सारांश :**
समाजातील विविध प्रकारच्या गरजूंना मदत करण्यासाठी, त्यांना काही योजनांद्वारे राज्य शासनाद्वारे अर्थसहाय्य देण्यात येते तर काही योजनांमार्फत केंद्र शासनाद्वारेसुद्धा अर्थसहाय्य देण्यात येते.याशिवाय काही योजना केंद्र आणि राज्य शासन यांच्याकडून संयुक्तिकरित्या राबविल्या जातात. चंद्रपूर जिल्ह्यासंदर्भात केंद्र शासनाच्या महत्वपूर्ण योजनांच्या प्रगतीचा आढावा घेतांना असे आढळून येते की मनरेगा संजय गांधी निराधार योजना राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती वेतन योजना यांच्या माध्यमातूनसुद्धा अर्थसहाय्य देण्याच सतत प्रयत्न करण्यात येत आहे

**मुख्यशब्द :** मनरेगा, बायोमेट्रिक , श्रावणबाळ सेवा, वृद्धापकाळ निवृत्ती वेतन इत्यादी.

**प्रस्तावना :-**

समाजातील विविध प्रकारच्या गरजूंना, जसे – अपंग, बेरोजगार, निराधार, वृद्ध, निराधार विधवा, अनाथ बालके , आजारी यांना मदत करण्यासाठी, त्यांना काही योजनांद्वारे राज्य शासनाद्वारे अर्थसहाय्य देण्यात येते तर काही योजनांमार्फत केंद्र शासनाद्वारेसुद्धा अर्थसहाय्य देण्यात येते.याशिवाय काही योजना केंद्र आणि राज्य शासन यांच्याकडून संयुक्तिकरित्या राबविल्या जातात.जास्तीत जास्त नागरिकांना या योजनांचा लाभ घेता यावा यासाठी शासन विभिन्न माध्यमाद्वारे प्रसार आणि प्रचार करीत असते,असे जाणवते.जसे- जाहिरातीद्वारे विविध माध्यमातून म्हणजेच दूरदर्शन,रेडीओ,याशिवाय बस –रेल्वे स्टेशन ,अनेक शासकीय कार्यालये ,बँक ,शाळा,महाविद्यालये,पोस्ट खाते ,सरकारी दवाखाने याठिकाणी योजनांच्या माहितीचे फलक लावण्यात येतात.प्रत्येक गरजूंपर्यंत या योजनांचा लाभ पोहोचविणे,हा उद्देश असतो.हा उद्देश पूर्ण करण्याकरिता ग्रामसेवक,महिला बचत गट,आशा कार्यकर्ती, ,आरोग्य सेवक, मुख्याध्यापक, महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी यांच्या माध्यमातूनसुद्धा सतत प्रयत्न करण्यात येत आहे, असे दिसते.

**योजनांचे लाभ माध्यम –बायोमेट्रिक :-**

**केंद्र शासनाच्या महत्वपूर्ण योजना :-**

**१.विशेष सहाय्य योजना :-**

अ . **संजय गांधी निराधार योजना :-** यात प्रत्येक पात्र व्यक्तीला रु.६००दरमहा अनुदान प्राप्त होते.

ब. **श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना :-** यात प्रत्येक पात्र व्यक्तीला रु.६००दरमहा अनुदान प्राप्त होते.

क. **इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती वेतन योजना :-** यात प्रत्येक पात्र व्यक्तीला रु.६००दरमहा अनुदान प्राप्त होते.

ड. **इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती वेतन योजना :-** यात प्रत्येक पात्र व्यक्तीला रु.४००दरमहा अनुदान प्राप्त होते.

इ. **राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना :-** यात दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील १८ ते ६४ वयोगटातील कमावत्या व्यक्तीचा अपघाती किंवा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबियास एकरकमी १० हजार रुपये अर्थसहाय्य देण्यात येते.

**चंद्रपूर जिल्ह्याबाबतची संक्षिप्त माहिती :-**

इसवी सन १८७४ पासून चंद्रपूर जिल्हा हा स्वतंत्र जिल्हा म्हणून गणला जाऊ लागला. इसवी सन १९६० मधे महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर चंद्रपूर जिल्हा हा महाराष्ट्र राज्यातील एक जिल्हा म्हणून गणला जाऊ

लागला. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये सध्या एकूण १५ तालुके कार्यरत आहेत.जिल्ह्यात १७.७ प्रतिशत लोक आदिवासी आहेत.जिल्ह्यातील ७९ प्रतिशत लोक शेतीवरच आपली उपजीविका करतात. चंद्रपूर जिल्ह्यातील जनतेला सरकारच्या विविध योजनांद्वारे सद्य तीन वर्षात कोणकोणता आणि किती लाभ झाला हे काही आकडेवारीवरून दिसून येते.

**संशोधनाचे तक्त्यानुसार स्पष्टीकरण :-**

**तक्ता क्रमांक 1.1 नुसार** चंद्रपूर जिल्ह्यासंदर्भात केंद्र शासनाच्या महत्वपूर्ण योजनांच्या प्रगतीचा आढावा घेतांना असे आढळून येते की **मनरेगा** (MGNREGA) Mahatma Gandhi National Rural Employment Guarantee Act या योजनेवर इसवी सन २०१८-१९मध्ये प्राप्त निधीच्या तुलनेत झालेला खर्च 2.85 प्रतिशत अधिक आहे. तर इसवी सन २०१९-२० आणि इसवी सन २०२०-२१मध्ये प्राप्त निधी आणि झालेला खर्च दोन्ही समान आहेत. **राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान** या योजनेवर इसवी सन २०१८-१९मध्ये प्राप्त निधीच्या तुलनेत झालेला खर्च ०.७५ प्रतिशत कमी आहे. तर इसवी सन २०१९-२० आणि इसवी सन २०२०-२१मध्ये प्राप्त निधी आणि झालेला खर्च दोन्ही समान आहेत . **राष्ट्रीय सामाजिक सहाय्यता कार्यक्रम** या योजनेअंतर्गत इसवी सन २०१८-१९मध्ये प्राप्त निधीच्या तुलनेत झालेला खर्च १३.९९ प्रतिशत इतका कमी दिसून येतो तर इसवी सन २०१९-२० मध्ये ५७.९२ प्रतिशत अधिक आहे आणि इसवी सन २०२०-२१या मधे ११.२७ प्रतिशत इतके कमी दिसून येते. **स्वच्छ भारत मिशन** या योजनेअंतर्गत इसवी सन २०१८-१९मध्ये प्राप्त निधीच्या तुलनेत झालेला खर्च २.६९ प्रतिशत इतका अधिक दिसून येतो तर इसवी सन २०१९-२० मध्ये २.४० प्रतिशत अधिक आहे आणि इसवी सन २०२ -२१या मधे ११.४५ प्रतिशत इतके अधिक दिसून येते. **स्वच्छ भारत मिशन ग्रामीण** या योजनेअंतर्गत इसवी सन २०१८-१९मध्ये प्राप्त निधीच्या तुलनेत झालेला खर्च ९.१९ प्रतिशत इतका कमी दिसून येतो तर इसवी सन २०१९-२० मध्ये ४.२९ प्रतिशत कमी आहे आणि इसवी सन २०२०-२१या मधे ९१४.९३ प्रतिशत इतका अधिक दिसून येते. **पंतप्रधान कृषी सिंचन योजना** या योजनेअंतर्गत इसवी सन २०१८-१९मध्ये प्राप्त निधीच्या तुलनेत झालेला खर्च ९.८६ प्रतिशत इतका कमी दिसून येतो तर इसवी सन २०१९-२० मध्ये १२.७९ प्रतिशत कमी तर इसवी सन २०२०-२१या मधे ७७.८३ प्रतिशत कमी दिसून येत आहे .

**स्वच्छ भारत मिशन ग्रामीण** या योजनेवर इसवी सन २०२०-२१या मधे प्राप्त निधीच्या तुलनेत झालेला खर्च ९१४.९३ प्रतिशत इतका प्रचंड अधिक दिसून येत आहे ,याचे कारण जागतिक महामारी असेल ,असे जाणवते.

**तक्ता क्र. १.२ नुसार** चंद्रपूर जिल्ह्यासंदर्भात केंद्र शासनाच्या महत्वपूर्ण योजनांमध्ये इसवी सन २०१८-१९च्या तुलनेत इसवी सन २०१९-२० आणि इसवी सन.२०२०-२१मध्ये झालेला प्राप्त निधीतील शेकडा बदल दर्शविण्यात आला आहे. **म्हणजेच** इसवी सन २०१८-१९च्या प्राप्त निधीला शंभर प्रतिशत मानल्यास इसवी सन २०१९-२० आणि इसवी सन २०२० २१मध्ये प्राप्त निधीतील **शेकडा बदल** नेमका किती आहे, हे दर्शविण्यात आले आहे. **मनरेगा** या योजनेमध्ये इसवी सन २०१८-१९च्या प्राप्त निधीच्या तुलनेत इसवी सन २०१९-२० मध्ये प्राप्त निधी मध्ये ४१.९० प्रतिशत इतका कमी आढळून येतो तर इसवी सन २०२०-२१ मध्ये हा बदल ३७.३५ प्रतिशत इतका कमी दिसून येतो. **राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान** या योजनेमध्ये इसवी सन २०१८-१९च्या प्राप्त निधीच्या तुलनेत इसवी सन २०१९-२० मध्ये प्राप्त निधी मध्ये २८.५७ प्रतिशत इतका कमी आढळून येतो तर इसवी सन २०२०-२१ मध्ये हा बदल ४३.०३ प्रतिशत इतका कमी दिसून येतो. **राष्ट्रीय सामाजिक सहाय्यता कार्यक्रम** या योजनेमध्ये इसवी सन २०१८-१९च्या प्राप्त निधीच्या तुलनेत इसवी सन २०१९-२० मध्ये प्राप्त निधी मध्ये २८.३५ प्रतिशत इतका जास्त आढळून येतो तर इसवी सन २०२०-२१ मध्ये हा बदल ४१.७२ प्रतिशत इतका जास्त दिसून येतो. **स्वच्छ भारत मिशन** या योजनेमध्ये इसवी सन २०१८-१९च्या प्राप्त निधीच्या तुलनेत इसवी सन २०१९-

२० मध्ये प्राप्त निधी मध्ये ९.८७ प्रतिशत इतका कमी आढळून येतो तर इसवी सन २०२०-२१ मध्ये हा बदल ३३.१८ प्रतिशत इतका जास्त दिसून येतो. **स्वच्छ भारत मिशन ग्रामीण** या योजनेमध्ये इसवी सन २०१८-१९च्या प्राप्त निधीच्या तुलनेत इसवी सन २०१९-२० मध्ये प्राप्त निधी मध्ये ५१.२५ प्रतिशत इतका जास्त आढळून येतो तर इसवी सन २०२०-२१ मध्ये हा बदल ९०.७५ प्रतिशत इतका कमी दिसून येतो. **पंतप्रधान कृषी सिंचन योजना** या योजनेमध्ये इसवी सन २०१८-१९च्या प्राप्त निधीच्या तुलनेत इसवी सन २०१९-२० मध्ये प्राप्त निधी मध्ये ९१.९७ प्रतिशत इतका जास्त आढळून येतो तर इसवी सन २०२०-२१ मध्ये हा बदल ४७.४० प्रतिशत इतका कमी दिसून येतो.

**राष्ट्रीय सामाजिक सहाय्यता कार्यक्रम आणि स्वच्छ भारत मिशन** या दोन योजनेमध्ये प्राप्त निधी मध्ये वाढ दिसत आहे. ती वाढ कोरोना महामारीमुळे असेल ,असे जाणवते.

**तक्ता क्र. १.३ नुसार** चंद्रपूर जिल्ह्यासंदर्भात केंद्र शासनाच्या महत्वपूर्ण योजनांमध्ये इसवी सन २०१८-१९च्या तुलनेत इसवी सन २०१९-२० आणि इसवी सन २०२०-२१मध्ये प्राप्त निधीतून झालेल्या खर्चातील शेकडा बदल दर्शविण्यात आला आहे. **म्हणजेच** इसवी सन २०१८-१९च्या प्राप्त निधीतून झालेल्या खर्चाला शंभर प्रतिशत मानल्यास इसवी सन इसवी सन २०१९-२० आणि इसवी सन २०२०-२१मध्ये प्राप्त निधीतून झालेल्या खर्चातील **शेकडा बदल** नेमका किती आहे, हे दर्शविण्यात आले आहे. **मनरेगा** या योजनेमध्ये इसवी सन २०१८-१९च्या प्राप्त निधीतून झालेल्या खर्चातील शेकडा बदलाच्या तुलनेत इसवी सन २०१९-२० मधील बदल हा ४३.५१ प्रतिशत इतका कमी आढळून येतो तर इसवी सन २०२०-२१ मध्ये हा बदल ३९.०९ प्रतिशत इतका कमी दिसून येतो. **राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान** या योजनेमध्ये इसवी सन २०१८-१९च्या प्राप्त निधीतून झालेल्या खर्चातील शेकडा बदलाच्या तुलनेत इसवी सन २०१९-२० मधील बदल हा २८.०३ प्रतिशत इतका कमी आढळून येतो तर इसवी सन २०२०-२१ मध्ये हा बदल ४२.६० प्रतिशत इतका कमी दिसून येतो.**राष्ट्रीय सामाजिक सहाय्यता कार्यक्रम** या योजनेमध्ये इसवी सन २०१८-१९च्या प्राप्त निधीतून झालेल्या खर्चातील शेकडा बदलाच्या तुलनेत इसवी सन २०१९-२० मधील बदल हा १.३६ प्रतिशत इतका अधिक आढळून येतो तर इसवी सन २०२०-२१ मध्ये हा बदल ४६.२१ प्रतिशत इतका अधिक दिसून येतो.**स्वच्छ भारत मिशन** या योजनेमध्ये इसवी सन २०१८-१९च्या प्राप्त निधीतून झालेल्या खर्चातील शेकडा बदलाच्या तुलनेत २०१९-२० मधील बदल हा १०.१२ प्रतिशत इतका कमी आढळून येतो तर इसवी सन २०२०-२१ मध्ये हा बदल ४४.५३ प्रतिशत इतका अधिक दिसून येतो.**स्वच्छ भारत मिशन ग्रामीण** या योजनेमध्ये इसवी सन २०१८-१९च्या प्राप्त निधीतून झालेल्या खर्चातील शेकडा बदलाच्या तुलनेत इसवी सन २०१९-२० मधील बदल हा ६६.५६ प्रतिशत इतका अधिक आढळून येतो तर इसवी सन २०२०-२१ मध्ये हा बदल ३.३५ प्रतिशत इतका अधिक दिसून येतो.**पंतप्रधान कृषी सिंचन योजना** या योजनेमध्ये इसवी सन २०१८-१९च्या प्राप्त निधीतून झालेल्या खर्चातील शेकडा बदलाच्या तुलनेत इसवी सन २०१९-२० मधील बदल हा ८५.५४ प्रतिशत इतका अधिक आढळून येतो तर इसवी सन २०२०-२१ मध्ये हा बदल ६३.७८ प्रतिशत इतका कमी दिसून येतो.

**राष्ट्रीय सामाजिक सहाय्यता कार्यक्रम ,स्वच्छ भारत मिशन** आणि **स्वच्छ भारत मिशन ग्रामीण या** तिन्ही योजनेमध्ये प्राप्त निधीतून झालेल्या खर्चातील शेकडा बदलाच्या तुलनेत इसवी सन २०१९-२० आणि इसवी सन २०२०-२१ मधील बदल हा बऱ्याच अधिक प्रमाणात आढळून येतो, हे सुद्धा कोरोना महामारीमुळे असेल ,असे जाणवते.

या योजनांव्यतिरिक्त एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम, दिनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना, अमृत, एकात्मिक बाल विकास योजना, सर्व शिक्षण अभियान SSA, मध्यान्न भोजन योजना,प्रधानमंत्री जन धन योजना , प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना,अटल पेन्शन योजना, प्रधानमंत्री मुद्रा योजना,

e-ISSN 2347 – 517X
Original Article

Stand अप इंडिया योजना, प्रधानमंत्री वय वंदना योजना इत्यादी अनेक योजना भरपूर प्रभावशाली आहेत.

**निष्कर्ष :-**

१. **तक्ता क्र. १.१ नुसार स्वच्छ भारत मिशन ग्रामीण** या योजनेवर इसवी सन २०२० -२१या मधे प्राप्त निधीच्या तुलनेत झालेला खर्च ९१४.९३ प्रतिशत इतका प्रचंड अधिक दिसून येत आहे ,याचे कारण जागतिक महामारी असेल ,असे जाणवते.

२. **तक्ता क्र. १.२ नुसार राष्ट्रीय सामाजिक सहाय्यता कार्यक्रम आणि स्वच्छ भारत मिशन** या दोन योजनेमध्ये प्राप्त निधी मध्ये वाढ दिसत आहे. ती वाढ कोरोना महामारीमुळे असेल ,असे जाणवते.

३. **तक्ता क्र. १.३ नुसार राष्ट्रीय सामाजिक सहाय्यता कार्यक्रम**, **स्वच्छ भारत मिशन** आणि **स्वच्छ भारत मिशन ग्रामीण या** तिन्ही योजनेमध्ये प्राप्त निधीतून झालेल्या खर्चातील शेकडा बदलाच्या तुलनेत इसवी सन २०१९-२० आणि इसवी सन २०२०-२१ मधील बदल हा बऱ्याच अधिक प्रमाणात आढळून येतो, हे सुद्धा कोरोना महामारीमुळे असेल, असे जाणवते.

**संदर्भ :**

http://mr.vikaspedia.in/social

https://financialservices.gov.in/hi/banking-divisions/Important-Schemes

dsa-Chandrapur २०१९ pdf / जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन – जिल्हा चंद्रपूर २०१९

dsa-Chandrapur २०२० pdf / जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन – जिल्हा चंद्रपूर २०२०

dsa-Chandrapur २०२१ pdf / जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन – जिल्हा चंद्रपूर २०२१

**तक्ता क्र. १.१**

**केंद्र शासनाच्या महत्वपूर्ण योजनांमध्ये इसवी सन २०१८-१९, २०१९-२०आणि २०२० -२१ मध्ये झालेला प्राप्त निधीच्या तुलनेत झालेल्या खर्चातील शेकडा बदल (चंद्रपूर जिल्हा)**

(अंक-लाख रु.)

| | | आर्थिक प्रगती | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अनु. क्र. | योजना | इसवी सन.२०१८-१९ | | इसवी सन २०१९-२० | | इसवी सन २०२० -२१ | |
| | | प्राप्त निधी | झालेला खर्च व बदल | प्राप्त निधी | झालेला खर्च व बदल | प्राप्त निधी | झालेला खर्च व बदल |
| १. | मनरेगा | १३८०६.१९ | १४२००.६९ | ८०२१.५० | ८०२१.५० | ८६५०.१७ | ८६५०.१७ |
| | | (१००) | (+२.८५ ) | (१००) | (०० ) | (१००) | ( ००) |
| २. | राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान | २०४९.३७ | २०३४.०० | १४६३.८४ | १४६३.८४ | ११६७.५३ | ११६७.५३ |
| | | (१००) | (-०.७५ ) | (१००) | (०० ) | (१००) | ( ००) |
| ३. | राष्ट्रीय सामाजिक सहाय्यता कार्यक्रम | १८२८.६१ | १५७२.७ | २३४७.०६ | १५९४.०७ | २५९१.५५ | २२९९.४२ |
| | | (१००) | ( -१३.९९) | (१००) | ( ५७.९२) | (१००) | (-११.२७ ) |
| ४. | स्वच्छ भारत मिशन | १०३८.५० | १०६६.४६ | ९३६.०२ | ९५८.५० | १३८३.०६ | १५४१.३९ |
| | | (१००) | ( +२.६९) | (१००) | (+२.४० ) | (१००) | (+११.४५ ) |
| ५. | स्वच्छ भारत मिशन ग्रामीण | ८५२.२२ | ७७३.९२ | १२८९.०२ | १२३३.६६ | ७८.८१ | ७९९.८७ |
| | | (१००) | (-९.१९) | (१००) | (-४.२९ ) | (१००) | (+९१४.९३ ) |
| ६. | पंतप्रधान कृषी सिंचन योजना | १४७.३९ | १३३.०० | २८२.९५ | २४६.७७ | २१७.२६ | ४८.१७ |
| | | (१००) | (-९.७६ ) | (१००) | (-१२.७९ ) | (१००) | ( -७७.८३) |

( स्त्रोत :- dsa-Chandrapur pdf / जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन – जिल्हा चंद्रपूर २०१९, २०२०, २०२१ )

I J R S S I S, Issue (IX), Vol. (I), May 2023: 204-210
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

तक्ता क्र. १.२

**केंद्र शासनाच्या महत्वपूर्ण योजनांमध्ये इसवी सन २०१८-१९च्या तुलनेत ई.सन.२०१९-२० आणि ई.सन.२०२० -२१मध्ये झालेला प्राप्त निधीतील शेकडा बदल(चंद्रपूर जिल्हा)**

(अंक-लाख रु.)

| | | आर्थिक प्रगती | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अनु. क्र. | योजना | इसवी सन २०१८-१९ | | इसवी सन २०१९-२० | | इसवी सन २०२० -२१ | |
| | | प्राप्त निधी | झालेला खर्च | प्राप्त निधी | झालेला खर्च | प्राप्त निधी | झालेला खर्च |
| १. | मनरेगा | १३८०६.१९ | १४२००.६९ | ८०२१.५० | ८०२१.५० | ८६५०.१७ | ८६५०.१७ |
| | प्राप्त निधीत झालेला शेकडा बदल | १०० | | -४१.९० | | -३७.३५ | |
| २. | राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान | २०४९.३७ | २०३४.०० | १४६३.८४ | १४६३.८४ | ११६७.५३ | ११६७.५३ |
| | प्राप्त निधीत झालेला शेकडा बदल | १०० | | -२८.५७ | | -४३.०३ | - |
| ३. | राष्ट्रीय सामाजिक सहाय्यता कार्यक्रम | १८२८.६१ | १५७२.७ | २३४७.०६ | १५९४.०७ | २५९१.५५ | २२९९.४२ |
| | प्राप्त निधीत झालेला शेकडा बदल | १०० | | +२८.३५ | | +४१.७२ | |
| ४. | स्वच्छ भारत मिशन | १०३८.५० | १०६६.४६ | ९३६.०२ | ९५८.५० | १३८३.०६ | १५४१.३९ |
| | प्राप्त निधीत झालेला शेकडा बदल | १०० | | -९.८७ | | +३३.१८ | |
| ५. | स्वच्छ भारत मिशन ग्रामीण | ८५२.२२ | ७७३.९२ | १२८९.०२ | १२३३.६६ | ७८.८१ | ७९९.८७ |
| | प्राप्त निधीत झालेला शेकडा बदल | १०० | | +५१.२५ | | -९०.७५ | |
| ६. | पंतप्रधान कृषी सिंचन योजना | १४७.३९ | १३३.०० | २८२.९५ | २४६.७७ | २१७.२६ | ४८.१७ |
| | प्राप्त निधीत झालेला शेकडा बदल | १०० | | +९१.९७ | | -४७.४० | |

( स्त्रोत :- dsa-Chandrapur pdf / जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन – जिल्हा चंद्रपूर २०१९, २०२०, २०२१ )

I J R S S I S, Issue (IX), Vol. (I), May 2023: 204-210 e-ISSN 2347 – 517X
A Double-Blind Peer Reviewed Journal Original Article

तक्ता क्र. १.३

**केंद्र शासनाच्या महत्वपूर्ण योजनांमध्ये इसवी सन २०१८-१९च्या तुलनेत ई.सन.२०१९-२० आणि ई.सन.२०२० -२१मध्ये झालेला प्राप्त निधीतून झालेल्या खर्चातील शेकडा बदल शेकडा बदल(चंद्रपूर जिल्हा)**

(अंक-लाख रु.)

| अनु. क्र. | योजना | आर्थिक प्रगती | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | इसवी सन २०१८-१९ | | इसवी सन २०१९-२० | | इसवी सन २०२० -२१ | |
| | | प्राप्त निधी | झालेला खर्च | प्राप्त निधी | झालेला खर्च | प्राप्त निधी | झालेला खर्च |
| १. | मनरेगा | १३८०६.१९ | १४२००.६९ | ८०२१.५० | ८०२१.५० | ८६५०.१७ | ८६५०.१७ |
| | झालेल्या खर्चातील शेकडा बदल | | १०० | | -४३.५१ | | -३९.०९ |
| २. | राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान | २०४९.३७ | २०३४.०० | १४६३.८४ | १४६३.८४ | ११६७.५३ | ११६७.५३ |
| | झालेल्या खर्चातील शेकडा बदल | | १०० | | -२८.०३ | | -४२.६० |
| ३. | राष्ट्रीय सामाजिक सहाय्यता कार्यक्रम | १८२८.६१ | १५७२.७ | २३४७.०६ | १५९४.०७ | २५९१.५५ | २२९९.४२ |
| | झालेल्या खर्चातील शेकडा बदल | | १०० | | +१.३६ | | +४६.२१ |
| ४. | स्वच्छ भारत मिशन | १०३८.५० | १०६६.४६ | ९३६.०२ | ९५८.५० | १३८३.०६ | १५४१.३९ |
| | झालेल्या खर्चातील शेकडा बदल | | १०० | | -१०.१२ | | +४४.५३ |
| ५. | स्वच्छ भारत मिशन ग्रामीण | ८५२.२२ | ७७३.९२ | १२८९.०२ | १२३३.६६ | ७८.८१ | ७९९.८७ |
| | झालेल्या खर्चातील शेकडा बदल | | १०० | | +६६.५६ | | +३.३५ |
| ६. | पंतप्रधान कृषी सिंचन योजना | १४७.३९ | १३३.०० | २८२.९५ | २४६.७७ | २१७.२६ | ४८.१७ |
| | झालेल्या खर्चातील शेकडा बदल | | १०० | | +८५.५४ | | -६३.७८ |

( स्रोत :- dsa-Chandrapur pdf / जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन – जिल्हा चंद्रपूर २०१९, २०२०, २०२१ )